## लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालयात 'उंच माझा झोका...' उपक्रम

सोलापूर : सातरस्ता मोदीखाना येथील रयत शिक्षण संस्थेच्या, लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालयातील सांस्कृतिक विभागाच्या वतीने नागपंचमी सणाचे औचित्य साधून, 'उंच माझा झोका...' या नाविन्यपूर्ण उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

विद्यार्थिनींच्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने, त्यांच्यातील क्रीडा व कला गुणांना वाव देण्यासाठी प्राचार्य डॉ. डी. जे. साळुंखे व उपप्राचार्य डॉ. रावसाहेब ढवण यांच्या मार्गदर्शनानुसार महाविद्यालयात खास 'झोका' बांधून विद्यार्थिनींना आपल्या मैत्रिणींसह झोका झुलवण्याचा आनंद घेण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली. ज्यामध्ये विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

उपक्रमाचा शुभारंभ करताना प्राचार्य डॉ. डी. जे. साळुंखे म्हणाले की, अभ्यासक्रमामुळे बौद्धिक विकास होतो. परंतु, शारीरिक व मानसिक विकासासाठी विभिन्न कला, क्रीडा व सांस्कृतिक उपक्रमांत सहभागी होणे अत्यावश्यक असते. यामुळे विद्यार्थिनी स्वतःतील न्यूनगंड दूर करून सामूहिक उपक्रमात सहभाग नोंदवण्यास प्रेरणा मिळेल. डॉ. रावसाहेब ढवण म्हणाले की, विद्यार्थिनींना आपल्या महाविद्यालयीन जीवनाचा निखळ आनंद घेता यावा म्हणून, महाविद्यालयात 'उंच माझा झोका...' उपक्रम घेण्यात आला आहे.

या उपक्रमासाठी महाविद्यालयातील संध्याराणी भोसले, महादेवी गायकवाड, रोहिणी पिरानाईक, प्राजक्ता साठे, सृष्टी चराटे, मेघना बोडगे, हर्षदा गवळी, पायल जाधव या विद्यार्थिनींनी विशेष पुढाकार घेतला. यावेळी प्रा. मोनाली राजगुरू, प्रा. वृषाली सापटणेकर, प्रा. गायकवाड, प्रा. देवराव मुंडे, प्रा. भक्तराज जाधव, प्रा. मोहन चव्हाण, डॉ. नागोराव भुरके आदी प्राध्यापक व विद्यार्थिनी उपस्थित होत्या. नागपंचमी सण हा महिलांच्या असल्यामुळे महिला महाविद्यालयात अशा नाविन्यपूर्ण उपक्रमाचे आयोजन केल्याबद्दल पालकांनी समाधान व्यक्त केले.

फोटो
जे. स
गाय
प्राध्य



Scanned by CamScanner